REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.7631(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X

VOLUME - 8 | ISSUE - 1 | OCTOBER - 2018

# दीनबंधु या वृत्तपत्राचे महाराष्ट्राच्या प्रबोधन परंपरेतील योगदान

प्रा. डॉ. देविदास वायदंडे
इतिहास विभाग प्रमुख, मु.सा.काकडे महाविद्यालय,सोमेश्वरनगर ,
ता. बारामती जि. पुणे.

## प्रस्तावना :

प्लासीच्या लढाईनंतर इंग्रजांच्या हाती सत्तेची सूत्रे आल्यानंतर व्यापारी कंपनी राज्यकर्ती बनली. पूर्वीचा वासाहातिक राज्यकारभार संपुष्टात आला. कंपनीला शासकीय व्यवहार करावा लागत असल्याने ऐत्तदेशीयांचा असंतोष वाढत चालला होता. तो असंतोष प्रकट करण्याची इच्छा प्रबळ होऊ लागली. याच इच्छेतुन भारतात वृत्तपत्रांचा जन्म झाला. या काळात सर्वात प्रथम पाश्च्यात्यांचाच पुढाकार राहिला. इंग्रजांच्या हातात सर्वात प्रथम जिथे सत्ता आली तेथेच सर्वप्रथम वृत्तपत्राचा जन्म झाला. बंगाल मध्येच सर्वप्रथम वृत्तपत्र प्रसिद्ध झाले. त्यानंतर मद्रास मुंबई या इंग्रजी अमलाखाली असलेल्या भागात वृत्तपत्राची सुरूवात झाली. ''मुंबई इंग्रजांच्या हाती १६६१ मध्ये आली परंतू मुंबईत तसे सार्वजनिक जीवन नसल्यामुळे वृत्तपत्रांची सुरूवात झाली ती मद्रास आणि कलकत्ता नंतर. मुंबईतील पहिले वृत्तपत्र 'बॉम्बे हेरॉल्ड' १७८९ साली निघाले''[१] या पत्रानंतर वर्षभरानंतर 'बॉम्बे कुरियर' हे पत्र ल्युक अ‍ॅश बर्नर याने १७९० मध्ये सुरू केले. या पत्राचे वैशिष्ट्ये असे होते की या पत्रात गुजराती मराठी (मोडी लिपीत) जाहिराती प्रसिद्ध होत असत. खरेतर १८३५ पर्यंत सरकारचे धोरण वृत्तपत्रांना फारसे अनुकूल नव्हते. वृत्तपत्र आणि शासन यांचा सनातन झगडा येथेही सुरू झाला. तेथून भारतीयांच्या असंतोषाला वृत्तपत्रांमधून चालाना मिळत गेली. विशेषत: सर चार्ल्स मेटकाफ याने आपल्या गव्हर्नर जनरल पदाच्या काळात वृत्तपत्रांना स्वातंत्र्य बहान करून त्यांच्या प्रसाराचा आणि विकासाचा माग मोकळा करून दिला. परिणामांची तमा न बाळगता शासनावर निर्भिडपणे शस्त्र धरण्याची तयारी संपादकांना ठेवावी लागते. शासनाचा रोष पत्करून जनहिताच्या दृष्टीने ठामपणे आपली भूमिका संपादकास ठेवावी लागते हे सारे गुण सुरूवातीच्या काळात इंग्रजी वृत्तपत्रांनी जरूर प्रकट केल्याचे दिसून येते. मराठी वृत्तपत्राचा व्यवसाय सर्वप्रथम मुंबई येथे सुरू झाला. सर्वात प्रथम मुंबईत गुजराती वृत्तपत्र सुरू झाले. त्यानंतर १० वर्षांनी मराठी वृत्तपत्र पुढे आले. कारण छापखाना / मुद्रण व्यवस्था आणि वाचक वर्ग मुंबईतच उपलब्ध होता हे नाकारता येणार नाही. १८७० पर्यंत महाराष्ट्राच्या शैक्षणिक व सामाजिक सुधारणेच्या चळवळीचे केंद्रही मुंबई हेच होते. याउलट पुण्याची स्थिती होते. पुणे ही पेशव्यांची राजधानी होती त्यामुळे जुन्या कल्पनांचा पगडा येथे होता. त्यामुळे मराठी वृत्तपत्रांचा उदय मुंबईत होणे साहजिक होते. शिक्षणाची नवी क्षितीजे व्यापक झाल्यानंतर सामाजिक प्रबोधनाचा प्रारंभ झाला. पाश्च्यात्य विद्येचा संस्कार लाभल्यानंतर पण या प्रबोधनाला मुंबईच्या सार्वजनिक जीवनाची व्यापकता होती त्यामुळे १८७० पर्यंत महाराष्ट्राच्या शैक्षणिक, धार्मिक व सामाजिक सुधारणेच्या चळवळीचे केंद्र मुंबई हेच राहिले''.[२] १८१५ साली मुंबईत अनाथ युरोपीयन मुलांना ख्रिस्ती धर्म प्रणीत शिक्षण देण्यासाठी मिशनऱ्यांनी 'दि बॉम्बे एज्युकेशन सोसायटी' स्थापन केली. १९२० साली एल्फिन्स्टन ने ऐत्तदेशीयांच्या मुलांसाठी नेटिव्ह स्कुल अ‍ॅन्ड एक कमिटीची स्थापना केली. त्यामुळे शिक्षतांचा नवा मर्यादित वर्ग मुंबईत हळूहळू निर्माण होत होता. त्यामुळे नव्या सुधारणावादी किंवा प्रबोधन पर्वाची सुरूवातच मुंबईत होत होती. हे सत्य आहे. नव शिक्षीतांनी त्यामुळे अध्यात्म, विद्या, शब्द पांडिता ऐवजी पदार्थ विज्ञान, रसायनशास्त्र, भुगोल, खगोलशास्त्र यांची चर्चा करण्यास सुरूवात केली. त्यामुळे साहजिक ज्ञान प्रसारासाठी छापण्याची साधने निर्माण करण्याची गरज निर्माण झाली. त्यामुळे ग्रंथनिर्मिती आणि वृत्तपत्रे ही ज्ञानप्रसाराची एकमेव साधने आहेत याची जाणीव झाली.




मराठी वृत्तपत्र अशाच जाणिवेतून निर्माण झाले होते. प्रबोधनाची, नव्या जाणिवांचा, पाश्चात्य विद्यांचा देशबांधवांना परिचय करून देण्याची प्रेरणा त्यामागे होती. ''[३] बाळशास्त्री जांभेकर यांनी मराठीती 'दर्पण' हे पहिले वृत्तपत्र काढले. असे असले तरी त्यापूर्वी एल्फिन्स्टनच्या काळात चापलिन या इंग्रजाने असा प्रयत्न कल्याचे दिसून

येते. 'दर्पण' हे एक वृत्तपत्र अस्तित्वात असल्याचा पुरावा उपलब्ध होतो. त्या वृत्तपत्राचे नाव होते 'मुंबापूर वर्तमान' त्याचा २० जुलै १८२८ रोजी रविवारी त्याचा पहिला अंक प्रसिद्ध झाला होता.''[४]अशा प्रकारे महाराष्ट्रात मराठी प्रबोधन परंपरेची काही वृत्तपत्रे निघाली होती.

महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी परंपरेतील काही थोडकी वृत्तपत्रे आपले कार्य प्रभावशाली करू शकली. अधिकतर वृत्तपत्रे ही पांढरपेशा वर्गाकडून चालवली जाणारी होती. पाश्चात्य तत्वज्ञान आणि विद्येचा प्रभाव असणारी होती. विशेषत: ब्राह्मण वर्गातील होती. त्यातील काही सर्वसमावेशकही होती; परंतु त्यांच्या कार्याला मर्यादा होत्या.

पांढरपेशा वर्गाच्या पलीकडे जो दलित–बहुजन वर्ग होता त्यांच्या पर्यंत हा परिवर्तनाचा, प्रबोधनाचा विचार पोहोचू शकत नव्हता त्यामुळे हा समाज सर्वच स्तरातून उपेक्षितच राहिला. कारण एकतर त्यांच्यात शिक्षणाचा विचार पोहोचू शकलेला नव्हता. सर्वच बाजुंनी ते वंचित व उपेक्षित रालिले होते. त्याचा विचार करून महात्मा ज्योतिबा फुले यांनी प्रबोधनवादी नवी विचार परंपरा मांडण्यास सुरूवात केली. त्यातुनच बहुजन समाजाच्या चळवळीतून 'दीनबंधु' हे वृत्तपत्र जन्मास आले होते. उपक्षित बहुजन समाजात जागृती करून त्यांचा उद्धार करण्यासाठी सुरू झालेल्या चळवळीचे आद्य प्रवर्तक महात्मा फुले होते. महात्मा फुल्यांचे एक प्रमुख सहकारी कृष्णराव भालेकर यांनी 'दीनबंधु' हे वृत्तपत्र सुरू केले. या वृत्तपत्राचे वैशिष्ट्य म्हणजे महाराष्ट्रात जो नवीन जागृतीचा प्रवाह सुरू झाला होता त्याचा विचार सामान्य स्तरापर्यंत पोहोचविण्याचे कार्य 'दीनबंधु' करित होते. ''हे वृत्तपत्र जरी कृष्णराव भालेकर यांनी सुरू केले असले तरी त्याची प्रेरणा महात्मा फुले हेच होते.''[५]

महात्मा फुले यांना वृत्तपत्राच्या प्रभावी उपयोगितेची जाणीव होती. त्यांना समाज जागृतीचे प्रभावी हत्यार म्हणून वृत्तपत्र महत्त्वाचे आहे ही गोष्ट आवश्यक वाटत होती. ज्या शुद्रातिशुद्रांच्या दास्यमुक्तीचा पुढाकार त्यांनी घेतला होता, त्यांची गाऱ्हाणी वेशीवर टांगण्यासाठी त्यांना परावर्तीत करण्यासाठी सरकारी दरबारी त्यांची गाऱ्हाणी मांडण्यासाठी वृत्तपत्र आवश्यक आहे याची जाणीव फुल्यांना झाली होती. १९व्या शतकातील सर्वच पत्रकार आणि संपादक हे वर्गातीलच होते. त्यामुळे उच्च वर्गीयांच्या प्रश्नापलिकडे त्यांचे लक्ष गेले नव्हते. शेतकरी, कष्टकरी, दलित उपक्षितच राहिला होता. खरे तर वृत्तपत्र हे समाज जागृती, धर्मचिकित्सन आणि सरकारी धोरणावर प्रखर टिका करण्याचे प्रभावी साधन असतानाही वृत्तपत्रे आपले काम प्रभावीपणे करू शकत नव्हती. सत्यशोधक समाजाची समाजाची स्थापना करून फुल्यांनी स्वार्थनिरपेक्ष अशा कार्यकर्त्याची एक परंपरा निर्माण करण्याचा प्रयत्न केला. या कार्यकर्त्यापैकीच एक प्रमुख धडाडीचे कार्यकर्ते कृष्णराव पांडुरंग भालेकर यांनी 'दीनबंधु' काढण्यासाठी पुढाकार घेतला होता. परंतु सत्यशोधक कार्याचा प्रसार करणे शेतकरी कामगारांची गाऱ्हाणी मांडणे हेच दीनबंधु चे प्रमुख ध्येय होते.

ज्योतिबांवर चिपळूणकर निबंधमालेतून प्रखर टिका करत. त्या टिकेला उत्तर 'दीनबंधु' मधून देण्यात येत असे. एकदा 'दीनबंधु'ने चिपळूणकरांना उत्तर देताना म्हटले की, ''मालाकारांचा झोक चरचरीत लिहिण्याकडे असतो व दुसऱ्याचा पाणउतारा करण्याची ऐट असते. फुले यांनी आपल्या बुकात पुराणे आणि स्मृतिपुराण यांचे चांगले विवरण केले आहे. फुले यांनी जे लिहिले आहे ते स्मृतिपुराणे यांचे प्रमाणांती असत्य असे व्यक्त करून दाखविले असते तर नारी करता आली असती. इश्वरीकृपेने या देशावर इंग्रजी राज्य झाले म्हणूनच आज पुढारी जाती शिवाय इतरांस काही तरी ज्ञान प्राप्त होऊन त्याचे हक्क कळू लागले आहेत. मालाकार आपले ज्ञातिच्या स्वभावा प्रमाणे दीर्घदर्शी आणि गुप्तद्वेशी मतलबी आहेत. इतर ज्ञातींची सुधारणा त्यास आवडत नाही. आता मालाकार यांनी धुर्तांनी नाडलेले दारिद्र्याने पीडलेले आणि अज्ञानात गढलेले अशा गाईबापड्या गरीब शुद्रावर हत्यार म्हटले फारच विपरीत समजले पाहिजे.''[६] 'दीनबंधु'ने अनेक लोकोपयोगी सरकारी कायद्याला पाठिंबा दिला. फुल्यांच्या विचार प्रसारासाठी अग्रक्रम देऊन त्यांना विरोध करणाऱ्यांचा समाचार घेण्यास कुठेही कसून केली नाही. तसेच सक्तीच्या शिक्षणासाठी 'दीनबंधु' कायम आग्रही राहिला.

कृष्णराव भालेकरांनी आर्थिक विवंचनेमुळे 'दीनबंधु'ची जबाबदारी सत्यशोधक समाजाचे आणखी एक धडाडीचे कार्यकर्ते नारायण मेघाजी लोखंडे यांच्याकडे सुपूर्द केली. नारायण मधाजी लोखंडे हे मुंबईतील कामगार संघटनांचे आद्यप्रवर्तक होते. त्यांचे आणखी एक सहकारी रामजी संतुजी आव हे यांच्या सहकार्याने त्यांनी 'दीनबंधु' चालवले. कालांतराने मुंबईतून हे पत्र छापण्यात येवू लागले. त्याचे संपादकही नारायण मेधाजी लोखंडे हे होते. नारायण मेधाजी लोखंडे हे तरूण सत्यशोधक होते. ते फुल्यांच्या विचारांनी प्रभावित होते. ज्योतिबा फुल्यांच्या मार्गदर्शनासाठी कामगारांचे प्रश्न सोडविण्यास प्रारंभ केला. दीनबंधुची जबाबदारी आल्यानंतर अनेक समाजोपयोगी कार्यात हिरहिरीने भाग घेतला. दिवसाचे १४ तास कामगारांना हाडाची काडे करून काम करावे लागते अशी ओरड दीनबंधुनी करण्यास सुरूवात केली. गिरणीतील बहुतेक कामगार हे ठेकेदारीने काम करीत. त्यांचे वेतन ठरलेले नव्हते. एकाच ठिकाणी कामगारांना बंदिस्त करत. याविरोधी 'दीनबंधु' मधून चर्चा सुरू झाली. कामावरून थोडा वेळ रजा घेतली तरी त्यांना ४ आणे दंड करण्यात येत असे. कामगारांचा प्रश्न हा गरीब जनतेचा प्रश्न असल्यामुळे 'दीनबंधु' हे वृत्तपत्र त्यांच्या हितासाठी कायम लढत राहिले.

नारायण मेधाजी लोखंडे यांनी दीनबंधुचे काम पाहून भारतातील पहिली कामगार संघटना 'मिल हॅन्ड असोशिएशन सोसायटी हीची स्थापना केली. ''शेतकऱ्यांचा आसुड'चे पहिले दोन भाग नारायण मेधाजी लोखंडे यांनी दीनबंधुत छापले होते. पण पुढचे भाग छापण्यास त्यांनी नकार दिला होता.''[७]

महात्मा फुल्यांचे विचार सामान्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी दीनबंधुमधुन प्रसिद्धी दिली जात होती. ''तारिख ४ फेब्रुवारी १८८९ रोजी यशवंतराव ज्योतीराव फुले लक्ष्मीबाई ग्यानोबा ससाणे यांच्या विवाह समारंभासाठी ज्योतीरावांनी रचलेली आणखी तीन मंगलाष्टके १० फेब्रुवारी १८८९ च्या अंकात छापण्यात आली होती''[८]

## सारांश

दीनबंधु हे वृत्तपत्र फुल्यांच्या विचाराने प्रेरित झाले होते. त्याचे पहिले संपादक कृष्णराव भालेकर व नंतर नारायण मेधाजी लोखंडे या दोघांनीही काही प्रमाणात फुले यांच्याशी झालेले मतभेद बाजुला करून त्यांच्या विचाराची कायम साथ दिली. सामान्य उपेक्षित, शेतमजूर, शेतकरी, कामगार यांच्या समस्या, गाऱ्हाणी सरकार दरबारी व जनते पर्यंत पोहोचविण्याचे काम दीनबंधु अखेर पर्यंत करित राहिला. कोणत्याही वृत्तपत्राची भूमिका ही समाजउद्धारक असावी परंतु तत्कालीन अनेक वृत्तपत्रे ही सनातनी आणि जातीय वर्चस्वातून निर्माण झाली होती. परंतू महाराष्ट्राच्या प्रबोधन–परंपरेत खऱ्या अर्थाने प्रबोधनाचा वसा आणि वारसा जपणारे दीनबंधु हे एकमेव वृत्तपत्र होते.

त्याकाळातील जवळ जवळ सर्वच वृत्तपत्रे चालविणारे नवविद्येचे लाभ मिळालेले होते. विशेष म्हणजे हे सर्व पांढरपेशे व ब्राह्मण वर्गातील होते. त्यांची दृष्टी सर्वसमावेशक नव्हती. पण त्यांच्या उद्देश कार्याला ते ज्या वर्गातून आले होते त्याच्या मर्यादा होत्या. याशिवाय अशा वृत्तपत्रकातून होणाऱ्या चर्चा या प्रचंड संख्येने असलेल्या लोकांच्या जीवनाला स्पर्श करणाऱ्या नव्हत्या. त्यामुळे 'दीनबंधु' शिवाय बहुजन समाजाची सुख दु:खे लक्षात घेऊन त्यांना वाचा फोडण्याचा प्रयत्न कोणीही केल्याचे दिसत नाही. म्हणूनच महाराष्ट्राच्या वृत्तपत्रांच्या इतिहासात व प्रबोधनाच्या परंपरेत दीनबंधु चे योगदान अत्यंत महत्त्वाचे आहे. त्याचे एकमेव कारण म्हणजे या वृत्तपत्राचा जन्मच लोकांच्या समस्या सोडविण्यासाठी आणि प्रबोधित करण्यासाठी झाला होता. याशिवाय फुल्यांच्या विचारांचा प्रभाव हेच या वृत्तपत्राचे प्रमुख वैशिष्ट्ये होते.

## संदर्भ

१. लेले रा.के. मराठी वृत्तपत्रांचा इतिहास, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे–३०, १९८४, प्र. आ. पृ. २७.
२. सरदार गं बा. राजर्षी शाहू महाराज यांच्या विचारांची दिशा, शाहू गौरव ग्रंथ (संपा) पी. बी. साळुंखे व इतर, मुंबई, पृ. ४५६ (१९७६)
३. पूर्वोक्त, मराठी वृत्तपत्रांचा इतिहास, पृ. ५४
४. उपरोक्त, पृ. ५४
५. उपरोक्त, पृ. १९८
६. कीर धनंजय, महात्मा जोतीराव फुले, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, चौथी आवृत्ती, २०१३, पृ. १६९
७. फडके य. दि. (संपा) महात्मा फुले समग्र वाङ्मय, पृ. १३८
८. उपरोक्त, पृ. १६७